# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

# SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY

(Formerly University of Pune)

Website: www.unipune.ac.in, E-mail Id.:ar.coordination@pun.unipune.ac.in, coe@unipune.ac.in, Phone No.: 020-25621440

**अत्यंत तातडीचे**

## परिपत्रक क्र.२३२/२०२५

**विषय :** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ४८(३)(क) अन्वये घटीत परीक्षा व मूल्यमापन विषयक समित्यांच्या कामकाजाकरिता सर्व विद्याशाखेअंतर्गतच्या विद्यापीठ मान्यताप्राप्त कार्यरत शिक्षकांची माहिती शिक्षकांच्या Profile वर अद्ययावत करणेबाबत.

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, सर्व विद्याशाखेअंतर्गतच्या हिवाळी सत्र परीक्षा २०२५ करिता प्रश्नपत्रिका तयार करणे, प्रश्नपत्रिकांचे नियमन करणे, तसेच मूल्यनिर्धारण व पुनर्मूल्यांकनाच्या कामकाजाकरिता प्राश्निक, परीक्षक व नियामक यांची नामिका सूची तयार करावयाची आहे. सदर कामकाजाकरिता विद्यापीठ मान्यताप्राप्त शिक्षकांची (नियमित/तासिका तत्वावरील/हंगामी कालावधी) अद्ययावत यादी आवश्यक आहे. याशिवाय विद्यार्थ्यांच्या परीक्षा व मूल्यमापन केवळ अशक्य आहे.

सर्व विद्याशाखेअंतर्गतंच्या अभ्यासक्रमांच्या परीक्षांच्या कालमर्यादित कामकाजाकरिता महाविद्यालयांकडून शिक्षकांची माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता विद्यापीठाच्या https://www.unipune.ac.in या संकेतस्थळावर Home→BOD Online या ठिकाणी लिंक उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

मा.प्राचार्य/मा.संचालक, सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये व परिसंस्था यांना विनंती करण्यात येते की, कार्यरत शिक्षकांनी त्यांची माहिती दोन दिवसांच्या आत (दि.१७.०९.२०२५ व दि.१८.०९.२०२५) ऑनलाईन पद्धतीने सदर लिंकद्वारे अद्ययावत करण्याबाबत आपल्या महाविद्यालयातील सर्व पात्र शिक्षकांना सूचित करावे. तसेच यापूर्वी आपल्या महाविद्यालयात कोणत्याही कारणांनी कार्यरत नसलेले शिक्षक यांची नावे वगळण्यात यावीत.

तसेच शिक्षकांच्या Profile मध्ये सध्या शिकवत असलेल्या अभ्यासपत्रिकांची (Courses) नावे नोंद करणे अनिवार्य असून याबाबत आपल्या महाविद्यालयातील/परिसंस्थेतील सर्वच शिक्षकांना आदेशित करावे.

**विशेषबाब म्हणून या परिपत्रकाकडे सर्वांचेच लक्ष वेधून आपल्या स्तरावर तात्काळ कार्यवाही व्हावी, असे निर्देशित करण्यात येत आहे.**

(प्रा.डॉ.प्रभाकर देसाई)
**प्रभारी संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

परीक्ष समन्वय कक्ष, परीक्षा विभाग
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
जा.क्र.७४१ ,दिनांक: १६.०९.२०२५

**प्रति,**

**मा.प्राचार्य/मा.संचालक, सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये व परिसंस्था**

**पुणे जिल्हा, अहिल्यानगर जिल्हा, नाशिक जिल्हा व दादरा आणि नगर हवेली केंद्रशासित प्रदेश**